# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११रोजी स्थापित राज्यविद्यापीठ व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## परिक्षा व मुल्यमापण मंडळ (गोपनिय)

फोन:– ०७१३२.२२३३५० Email:- gopniyagug@gmail.com

**गोवि/प.मु.मं/गोप/जा.क्र./2064/२०१८** **दिनांक २६/०२/२०१८**

## सत्र उन्हाळी २०१८ पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रात्याक्षिक परीक्षा

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांना तसेच संबधीतांना कळविण्यात येते की, सर्व पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमातील सेमीस्टार २,४,६,८ व १० मधील संबधीत अभ्यासक्रमाच्या प्रात्याक्षिक परीक्षा दि. २०/०३/२०१८ ते दि. ०३/०४/२०१८ या कालावधी मध्ये आयोजीत करण्यात आलेल्या असुन सदर प्रात्याक्षिक परीक्षेबाबत महत्वपुर्ण सुचना खालील प्रमाणे निर्गमीत करण्यात येत आहेत.

१) विद्यापीठाने दिलेल्या कालावधीमध्ये प्रात्याक्षिक परीक्षांचा कार्यक्रम पुर्ण करावयाचा आहे. व दिलेल्या कालावधीत महाविद्यालयात वेळापत्रक तयार करून विद्यार्थ्यांची प्रात्याक्षिक परीक्षा विद्यापीठाने दिलेल्या परीक्षका मार्फत घ्यावयाची आहे.

२) ज्या महाविद्यालयात विद्यापीठाचे मान्यताप्राप्त प्राचार्य व प्राध्यापक नाहीत अशा महाविद्यायांनी आपल्या महाविद्यालयात संबधीत विषयाकरीता तासिका तत्वावर प्राध्यापक नियुक्त करून विद्यापीठाची रितसर मान्यता घेतली असेल तरच अशा तासिका तत्वावर आधारीत मान्यताप्राप्त प्राध्यापकांना प्रात्याक्षिक परीक्षेत अंतर्गत परीक्षक म्हणुन विद्यापीठाच्या परवानगीने कार्य करता येईल.

३) सेमीस्टर १,३,५ व ७ मधील हिवाळी २०१७ मध्ये झालेल्या प्रात्याक्षिक परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची प्रात्याक्षिक परीक्षा सत्र उन्हाळी २०१८ च्या परीक्षेसोबतच महाविद्यालय स्तरावर घेण्यात यावी. मात्र सदर विद्यार्थ्यांचे प्रात्याक्षिकांचे विहीत शुल्क विद्यापीठामधे जमा केलेले असावे.

४) ज्या विद्यार्थ्यांचे नामाकंन झालेले असुन परीक्षा आवेदनपत्र व प्रात्याक्षिक परीक्षेचे शुल्क विद्यापीठात जमा केलेले आहे अश्याच विद्यार्थ्यांची प्रात्याक्षिक परीक्षा घ्यावी. हि सर्वस्वी जबाबदारी प्राचार्याची व संबधीताची राहील.

५) तसेच सर्व महाविद्यालयांना या अधिसुचनेद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठामध्ये एकदा प्रात्याक्षिक परीक्षेचे गुण **(Practical Mark) Online** सादर केल्यानंतर सदर गुणामध्ये कोणताच बदल करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

६) सेमीस्टर २,४,६,८ व १०च्या प्रात्याक्षिक परीक्षांशी संबधीत अंतर्गत व बाहय परीक्षकांची नावे ई–मेल द्वारे /स्वहस्तेदेण्यात /पाठविण्यात येतील. ज्या महाविद्यालयांना प्रात्याक्षिक परीक्षेची माहीती अप्राप्त असल्यास त्यांनी गोपनिय विभागाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा. दुरध्वनी क्र. ०७१३२–२२३३५०

७) सेमीस्टर २,४,६,८ व १० तसेच मागील सत्रातील अनुर्त्तीण विद्यार्थ्याच्या सर्व प्रात्याक्षिक परीक्षेमधील **विद्यार्थ्यांच्या लिखीत उत्तर पत्रिका हया महाविद्यालयामध्ये संकलीत करून सुरक्षित ठेवण्यात यावे** व विद्यापीठाला सदर दस्ताऐवजाची आवश्यकता भासल्यास ते मागविण्यात येतील. आणि **विद्यार्थ्यांना परीक्षकांनी स्वहस्ते देण्यात आलेल्या गुणदानाची प्रत विद्यापीठामध्ये सादर करावी**.

८) सदर प्रात्याक्षिक परीक्षा ही दिलेल्या कालावधी मध्ये पुर्ण होऊ न शकल्यास उर्वरीत प्रात्याक्षिक परीक्षा ही थेअरी परीक्षा संपल्या नंतर लगेच १० दिवसाचे आत घेण्यात याव्या. व त्यापुर्वी याबाबत विद्यापीठाला माहीती देण्यात यावी.

९) **प्रात्याक्षिक परीक्षा संपल्या नंतर सदर गुण लगेच (https://gondwana.university) या संकेतस्थळावर Online अपलोड करावे व परीक्षकांनी स्वहस्ते देण्यात आलेल्या गुणदानाची प्रत दोन दिवसाचे आत विद्यापीठात सादर करावी.**

**सदर कार्यात काही तांत्रीक अडचणी आल्यास खालील भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.**

**१) श्री. योगेश डफर, प्रोमार्क समन्वयक (९७३००४४२२४)**
**२) श्री. नितीन वैद्य (८९७५४१४५९१)**
**३) श्री. ज्ञानेश्वर सातपैसे (९४२११३१४०५)**

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली